महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा क्र: तंशिविकापु/विवि/बीबीए-बीसीए २०२४-२५/२०२४/3564. दिनांक : 29 AUG 2024

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मान्यताप्राप्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व
एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग.

**विषयः शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन संचालनालयाच्या मान्यतेबाबत..**

संदर्भ :
१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४, दिनांक ०७.०८.२०२४.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/डीटीई मान्यता/२०२४/५७९ दिनांक ०८.०८.२०२४.
३) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/बीबीए-बीसीए२०२४-२५/२०२४/३२७६ दिनांक ०९.०८.२०२४.
४) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६०६ दिनांक १६.०८.२०२४.
५) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६६२ दिनांक २८.०८.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थां व पूर्वीपासून तंत्रशिक्षण संचालनालयाचा अंतर्गत (डिटीई सांकेतांक प्राप्त) असलेल्या संस्थांना या विभागीय कार्यालयाकडून संकेतांक (युजर नेम) व पासवर्ड घेऊन संस्थेची प्रवेश क्षमतेबाबतची माहिती ugpg24.dtemaharashtra.gov.in संकेतस्थळावर भरणेबाबत संदर्भ क्रमांक ४ मधील परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. तथापि, अद्यापही काही संस्थांनी या विभागीय कार्यालयाकडून संदर्भ क्रमांक ४ मधील परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या ६ कागदपत्रांची (सत्यप्रत) पूर्तता करुन संकेतांक (युजर नेम) व पासवर्ड प्राप्त केलेला दिसून येत नाही.

संदर्भ क्रमांक ५ मधील संचालनालयाच्या परिपत्रकानुसार संस्थांना संकेतांक (युजर नेम) व पासवर्ड घेऊन संस्थेची प्रवेश क्षमतेबाबतची माहिती ugpg24.dtemaharashtra.gov.in संकेतस्थळावर भरण्यासाठी **दि. ०४.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहिती विहीत कालावधीत सादर न केल्यास अथवा सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील.

**सोबतः संदर्भ क्रमांक ५ मधील परिपत्रक.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई (कार्यासन क्र. २) यांना माहितीस्तव.

D:\Yogesh Kelkar\Admission 2024-25\Degree\BBA BCA\Cicular to BBA BCA.docx

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://dte.maharashtra.gov.in

महत्वाचे -परिपत्रक

क्रमांक : २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६६२ दिनांक : 28 AUG 2024

प्रति,
संचालक / प्राचार्य,
बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए,
एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करून संचालनालयाच्या मान्यतेबाबत....

संदर्भ : १)शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४,दि. ७.८.२०२४
२)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/५७९, दि.८.८.२०२४
३)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६०६, दि.१६.८.२०२४

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान केली आहे व सदर मान्यतेस अनुसरून संबंधित संस्थांना संकेतांक आणि पासवर्ड विभागीय कार्यालयांमार्फत प्रदान करण्याच्या सूचना तसेच त्यांची प्रवेशक्षमतेस मान्यता देण्यासंदर्भात सूचना संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांकडून कार्यवाही सुरू आहे. संस्थांना प्रवेशक्षमता मान्यतेनंतर संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार आहे. याबाबत संस्थांना ऑनलाईन प्रणालीव्दारे https://ugpg२४.dtemaharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी कळविले होते. तथापि, अद्यापही काही संस्थांनी माहिती भरलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता, ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. करीता संस्थांना माहिती भरण्यासाठी दि.४.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून, या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे. विभागीय कार्यालयाने संस्थेची माहिती अचुक असल्याची पडताळणी करुन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी प्रवेशक्षमता दिनांक ०५.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निश्चित करावी.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहीती विहीत कालावधीत सादर न केल्यास अथवा सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्धवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/ संचालक जबाबदार राहतील.

दि.०४.०९.२०२४ नंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे - त्यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित संस्थाना आपले स्तरावरुन सदर परिपत्रक अग्रेषित करण्यात यावे.